# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


MERC/ADM/RTI/017/2022/**0167** Dt. 20.04.2022

प्रति,
सौ. विजया संतोष कदम,
२६३/३, रमजान भटार चाळ,
डॉ. आंबेडकर चौक, कुर्ला (प.),
मुंबई ४०००७०.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. ०८.०४.२०२२ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.०८.०४.२०२२ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | लाईट मिटर काढून नेला आहे. इलेक्ट्रीसीटी ॲक्ट २००३ प्रमाणे कोणतीही पूर्वसूचना, कायदेशीर नोटिस दिलेली नाही. दि. २.१२.२०२१ रोजी आपणांस पाठविलेले पत्र. (कालावधी १.१.२०२० ते आजतागायत)<br><br>मी आपणांस कळवू इच्छित आहे की, आंबेडकर चौक येथे जास्तीत जास्त बौध्द व मुस्लीम लोक राहतात याठिकाणी अदानी ईलेक्ट्रिसीटी यांचे अधिकारी, कर्मचारी हे खाजगी कामगार ठेकेदार नेमून लोकांचे लाईट मिटर एक-दोन महिने बिल थकीत झाले असता काढून नेतात ते मिटर काढतेवेळेस ठेकेदाराची माणसे लोक, ज्यांना पीडब्ल्यूडीचा परवानापत्र नाही ते लाईट मिटर बॉक्स उघडून मिटर काढून नेतात. तसेच लोकांना विनारिडींगचे पैसे मागून दमदाटी करतात. याबाबत चौकशी व कारवाई करावी. | आपणांस नेमकी कोणती माहिती हवी आहे याचे बोध होत नाही.. कृपया माहितीचा अधिकार अधिनियम कलम 2 मधील उपखंड (च) प्रमाणे माहिती मागावी. जेणे करुन जन माहिती अधिकारी यांना आपणांस योग्य माहिती पुरविणे शक्य होईल.<br><br>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित |


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| | | माहिती, यांचा समावेश होतो.<br><br>तसेच आपला दि. ०२.१२.२०२१ रोजीचा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता अदाणी इलेक्ट्रीसीटी मुंबई लि. या कार्यालयास दि २२.१२.२०२१ रोजी अग्रेषित केलेला आहे. (सोबत पत्र जोडले आहे) |

आपल्या जर वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारी असतील तर त्यासाठी आयोगाने ग्राहक तक्रार निवारण मंच (CGRF) या यंत्रणेची निर्मिती केलेली आहे. प्रकरणारुप ग्राहक त्यांच्या तक्रारीसाठी या यंत्रणेकडे दाद मागू शकतो. सदर विनियम [महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२०] आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४०००05. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/ ६५/ ६९ **Email:** **anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी